।। सा विद्या या विमुक्तये ।।

**स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड**

"ज्ञानतीर्थ" परिसर, विष्णुपुरी, नांदेड - ४३१६०६ (महाराष्ट्र)

**SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY NANDED**

"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded - 431606 Maharashtra State (INDIA)

Established on 17th September 1994 – Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade

**जनसंपर्क कार्यालय (PUBLIC RELATIONS OFFICE)**

**Phone: (02462) 229325** **Website: www.srtmun.ac.in** **E-mail: srtmunpro1@gmail.com**


संदर्भ क्र.: ज.का./२०२१-२२/४० दि.०६/०६/२०२१

## 'स्वारातीम' विद्यापीठामध्ये 'शिवस्वराज्य दिन' साजरा



स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील स्वागत कक्षामध्ये दि. ६ जून रोजी 'शिवस्वराज्य दिन' साजरा करण्यात आला. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. उद्धव भोसले यांच्या हस्ते राजे छत्रपती शिवाजी महाराजांच्या अर्धकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

छत्रपती शिवाजी महाराज हे महाराष्ट्राचेच नव्हे तर अखिलभारत वर्षाचे प्रेरणा स्थान आहेत. राष्ट्रनिर्माता असलेल्या या महापुरुषांच्या, लोककल्याणकारी स्वराज्यातील महत्वाचा दिवस म्हणजे ६ जून १६७४ म्हणजेच 'शिवस्वराज्य अभिषेक दिन' होय. राज्याभिषेक दिवस शिवस्वराज्याची सार्वभौमत्वाची, स्वातंत्र्याची प्रेरणा देणारा दिवस आहे. हा दिवस 'शिवस्वराज्य दिन' म्हणून साजरा करण्याच्या निर्णय महाराष्ट्र शासनाने घेतलेला आहे.

यावेळी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. जोगेन्द्रसिंह बिसेन, कुलसचिव डॉ. सर्जेराव शिंदे, विज्ञान व तंत्रज्ञान विभागाचे अधिष्ठात डॉ. एल. एम. वाघमारे, वित्त व लेखाधिकारी डॉ. डी.एम. खंदारे, नवोपक्रम नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक, डॉ. राजाराम माने, क्रीडा विभागाचे संचालक डॉ. विठ्ठलसिंह परिहार, राष्ट्रीय सेवा विभागाचे संचालक डॉ. शिवराज बोकडे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. रवि सरोदे, डॉ. शैलेश वाढेर, प्रा. एम.के. पाटील, प्रा. रमेश ढगे, प्रा. बि.आर. सूर्यवंशी, उपवित्त व लेखाधिकारी डॉ. गोविंद कतलाकुटे, जनसंपर्क अधिकारी डॉ. अशोक कदम, कार्यकारी अभियंता तानाजी हुस्सेकर, अरुण धाकडे, डॉ. डी. एम. तंगलवाड, यांच्यासह विद्यापीठातील संचालक, शिक्षक, अधिकारी व कर्मचारी यांनी कोव्हीड-१९ च्या संसर्गजन्य आजारामुळे सामाजिक अंतराचे पालन करून छत्रपती शिवाजी महारांच्या अर्धकृती पुतळयास पुष्प अर्पण करून अभिवादन केले. शेवटी महाराष्ट्र गीतानंतर, राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

---

प्रति,
मा. संपादक/ जिल्हा प्रतिनिधी,
दैनिक/इलेक्ट्रॉनिक मेडिया/सामाजिक संपर्क माध्यम,
सप्रेम नमस्कार,
मान्यवर/ महोदय,
उपरोक्त बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिद्धीस देऊन सहकार्य करावे, ही नम्र विनंती.

आपला विश्वासू,
जनसंपर्क अधिकारी,
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,
ज्ञानतीर्थ, विष्णुपुरी, नांदेड - ४३१ ६०६.